# मुंबई विद्यापीठ

**महत्वाचे**
पबंध विभाग,
मुंबई - ४०००३२

क्र.प्रबंध/आय सी डी / २०१२-१३/ १९२३ /२०१२.

दि. ८ जुलै २०१२

**परिपत्रक (सुधारीत)ः**

मुंबई विद्यापीठामार्फत दिनांक २८ एप्रिल, २०१२ रोजी विद्यावाचस्पती प्रवेश परीक्षा २०१२ ( **Ph.D. Entrance Test 2012** ) परीक्षा घेण्यात आली होती, त्यात अर्थशास्त्र, भुगोल, मानसशास्त्र, ग्रामीण विकास, समाजशास्त्र, समाजकार्य (सोशल वर्क), वाणिज्य, व्यावसायीक अर्थशास्त्र (बिझनेस इकाँनाँमिक्स), व्यावसायीक प्रशासन व धोरण (बिझनेस पाँलिसी अँन्ड अँडमिनिस्टेशन) व शिक्षणशास्त्र (एज्युकेशन) या विषयांच्या काही विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, परीक्षा मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांनी दि. २८ एप्रिल २०१२ रोजी परीक्षा दिली असेल व ज्यांना मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका घेऊन परीक्षा द्यावयाची असेल अशा विद्यार्थ्यांची परीक्षा मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका देऊन शनिवार, दिनांक १४ जुलै, २०१२ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत डाँ. शंकर दयाळ शर्मा भवन, दुर शिक्षण व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताकृझ (पूर्व), मुंबई-४०००९८ येथे घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेस बसण्यासाठी इच्छुक परीक्षार्थींनी को-या कागदावरील आपला अर्ज शनिवार, दिनांक ९ जुलै २०१२ रोजी पर्यंत दुपारी ४ वाजेपर्यंत अधीक्षक, प्रबंध विभाग, कक्ष क्र. १२९, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०००३२ यांचे कार्यालयात जमा करावेत. आपल्या अर्जासोबत दि.२८ एप्रिल २०१२ रोजीच्या परीक्षेच्या प्रवेशपत्राची (हाँल तिकीट) छायांकित प्रत संदर्भाकिरोता जोडावी.

या परीक्षेसाठी नव्याने अर्ज करता येणार नाही तसेच या परीक्षेसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांचे दि.२८ एप्रिल २०१२ रोजीच्या परीक्षेचे गुण रद्द करण्यात येऊन दि.१४ जुलै २०१२ रोजीच्या परीक्षेचेच गुण ग्राह्य धरण्यात येतील याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

-सही-
प्रभारी परीक्षा नियंत्रक

D